# लातूर जिल्हयातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

( कालावधी -2012 ते 2022)

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत

अर्थशास्त्र विषयातील (Ph. D.) पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा


**संशोधक**

**लता रंगराव माने**

**(एम.ए., बी.एड. )**

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. शेषेराव श्रीमंतराव देवनाळकर**

M.A., B.Ed., NET & Ph.D.

अर्थशास्त्र विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक,

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर


**PET - 2022**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत

अर्थशास्त्र विषयातील (Ph. D.) पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

# लातूर जिल्हयातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

(कालावधी - 2012 ते 2022)

| | | |
|---|---|---|
| संशोधकाचे नाव | - | लता रंगराव माने |
| विषय | - | अर्थशास्त्र |
| मोबाईल नंबर | - | 8149466607 |
| प्रवर्ग | - | ओ.बी.सी ( हिंदु – न्हावी ) |
| पत्ता | - | झिंगन्नप्पा गल्ली, सिताराम निवास लातूर – 413512 |
| ई-मेल आय.डी. | - | latamane47@gmail.com |
| मार्गदर्शकाचे नाव | - | प्रा. डॉ. शेषेराव श्रीमंतराव देवनाळकर |
| महाविद्यालयाचे नाव | - | अर्थशास्त्र विभागप्रमुख, |
| | | महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा , ता. निलंगा, जि. लातूर. |
| मोबाईल नंबर | - | 9850037250 |
| ई-मेल आय.डी. | - | sdevnalkar44@gmail.com |

# लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (कालावधी - 2012 - 2022)

**प्रस्तावना:**

भारत देश हा विविधतेने नटलेला आहे. भारतात अनेक जातीधर्माचे लोक राहतात, त्यामध्ये अनेक भाषा, विविध संस्कृती, चालीरिती, रुढी पंरमपरा, व्यववसाय विभीन्नता, ग्रामीण शहरी रचना असे भारतीय समाजाचे खास वैशिष्टये आहेत. म्हणून समाजाचे अनेक जाती समुदायाचे लोक एकत्र वास्तव्यास राहतात.

भारत हे विविध जातीधर्माचे ओळख असणारे राष्ट्र असून १२ बलुतेदार आपल्या जातीधर्मानुसार व्यवसाय करतात, आर्थिक विकासाच्या काळात सरकारने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली. देशातील मानवसंसाधनाच्या विकासावर भर देण्यात येत आहे. आर्थिक विकास ही प्रक्रीया निरंतर चालत आली आहे. आणि देशामध्ये आर्थिक विकासाबरोबर मानव विकास होणे गरजचे आहे. मानवाच्या विकासाची मूलतत्त्वे समजून घेण्यांसाठी वाढ, विकास व बदल या संकल्पनेचा अभ्यास महत्त्वपूर्ण समजला जातो. मानव समाजाच्या आर्थिक सामाजिक, राजकीय, कायदेविषयक संस्थानाची संरचना वेगवेगळ्या प्रकारांतील पर्यावरण, कला, संस्कृती घटकांचा समावेश होतो. सर्व प्रकारच्या आर्थिक विकासात मानव हा केंद्रबिंदू आहे. मानवाच्या जीवनामानाचा दर्जा उंचाविण्यासाठी आरोग्य, शिक्षण मूलभूत सुविधाचा लाभ देवून देशाच्या अल्पसंख्याक विविध जाती धर्माचा विकास करणे हा मुख्य हेतू आहे.

मानव सजीव सृष्टीतील महत्त्वपूर्ण घटक असून तो वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या धर्मात जातीपातीत उदयाला आला आहे. जाती धर्मातील त्यात हिंदू, जैन, पारशी, बौध्द, न्हावी, चांभार, कुंभार इ. काही न माननाऱ्या धर्मालाही अस्तित्व आहे, अल्पसंख्याक समाज

आहे. त्यात OBC प्रर्वगातील लोकसंख्याा राहते भारतात २९ राज्ये आणि ९ केंद्रशाषित प्रदेशात आजही विविध जातीधर्माचे लोक आपले पारंपारिक व्यवसाय करतात, महाराष्ट्र, केरळ, तेलंगणा, आसाम, पं. बंगाल या राज्यात कामाचे स्वरूप वेगवेगळे दिसून येते.

भारत हा जगातील लोकसंख्यांच्या दृष्टीने दुस-या क्रमाकांचे राष्ट्र होते सध्या ते पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र आहे. भारताची लोकसंख्या २०११ मध्ये १२१ करोड़ आहे. महाराष्ट्र राज्यात नाभिक समाज हा आधिक प्रमाणात आहे. परंतू  नाभिक समाजाकडे आर्थिक व सामाजिकदृष्टया शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. जसे की व्यवसाय शिक्षण, स्त्रियांना दिला जाणारा दुय्यम  दर्जा, बालगुन्हेगार, बेरोजगारी इत्यादी समस्या असल्यामुळे हा समाज आर्थिक व सामाजिकदृष्या आर्थिक प्रगतीपासून वंचित आहे.

महाराष्ट्र हे भोगोलीक दृष्टया संपन्न राज्य असून या राज्यायत विविध धर्माचे वर्गाचे लोक एकत्र राहतात. महाराष्ट्र हा २९ राज्यापैकी एक असून महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्ह्याचा समावेश आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यापैकी लातूर हा एक जिल्हा आहे आणि या जिल्ह्यात १० तालुक्यांचा समावेश आहे. लातूर जिल्ह्याची निर्मीती १६ ऑगस्ट १९८२ ला झाली. या जिल्ह्यात विविध जातीधर्माचे लोक एकत्र राहतात नाभिक समाजातील लोकसंख्या जिल्ह्यातील १० तालुक्यांमध्ये विस्तारीत झाली आहे.

‘मराठवाडाच्या या प्रादेशिक विभागातील लातूर हा एक जिल्हा असून या जिल्ह्यात नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभाव असून लोकसंख्येचा विस्तार ग्रामीण व शहरी भागात कमी अधिक प्रमाणात झाला आहे. लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांमध्ये न्हावी समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. लातूरचा विचार करता ६०० दुकाने सलूनचे आणि १२०० घरे नाभिक समाजाची आहेत. शहरी ग्रामीण भागाचा विचार केला तर विविध व्यवसायत कोणी सलून, ब्यूटीपार्लर, बलुतेदार, लघु, मध्यम कोणी मोठ्या व्यावसायात गुंतला असून या समाजाची आर्थिक स्थिती व्यवसायावर अवलंबुन आहे. त्यात प्रामुख्याने केशकर्तन, सलून,  ब्यूटीपार्लर, व्यवसाय, मजूरी, शिवणकाम

इत्यादीचा समावेश होतो. या समाजाची आर्थिक स्थिती या व्यवसायावर अवलंबून आहे. या समाजाला श्री संतसेना महाराजानी अशी ओळख करुन दिली. “वाटीत पाणी सदा आमदानी” **नाभिक या शब्दाचा अर्थ भिक न मागणे असा होतो.** म्हणून संतसेना महाराज म्हणतात ‘कार्य कर चिंता करु नको’ असा कार्यरत हा समाज आहे. प्रस्तूत संशोधनाच्या माध्यमातून न्हावी समाजाचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणाचा प्रयत्न केला जाणार आहे.

**विषयाची निवड Choice subject**

प्रस्तुत विषयात देशातील नाभिक समाज हा १२ बलुतेदारी पध्दतीमध्येच ओळखला जातो. या समाजात तीव्र स्वरुपाच्या समस्या दिसून येतात. त्यात आर्थिक विषमता, उपासमार, अज्ञान, बेरोजगारी, दारिद्रय, वाढती लोकसंख्या या समस्या अधिक आहेत. भारतासारख्या देशात नाभिक समाजाला अनेक समस्येला सामोरे जावे लागते. महाराष्ट्रातील या समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती खालावत चालली आहे. त्यासाठी त्यांना विकास प्रक्रीयेत आणण्यासाठी परिस्थिती बदलण्या साठी आर्थिक नियोजन करणे गरजेचे आहे. या हेतूने प्रस्तुत संशोधन आवश्यक वाटते,

**संशोधनाची गरज व महत्त्व Need and importance of Research**

विकसनशील देशात साधनसंपत्तीचे वितरण हे असमान झालेले आहे. त्यामुळे प्रत्येक स्तरावर योग्य प्रमाणात वितरण झाले नाही, त्यामुळे भारतात गरीब हा गरीब आहे व श्रीमंत हा श्रीमंत आहे. अशी ही विषमतेची दरी असल्यामुळे ही विषमता कमी करण्यासाठी देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचे सर्व समाजामध्ये समान न्यायपद्धतीने वितरण होणे आवश्यक आहे. त्यातून आर्थिक व सामाजिक न्याय मिळवून देणे. देशाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत नाभिक समाज जो बारमाही व्यवसाय करणारा आहे. या समाजाचे विश्लेषणात्मक अध्ययन होणे काळाची गरज आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये Aims Of objective of the Research**

१. लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाचे स्वरुप जाणून घेणे.

२. लातूर जिल्हयातील नाभिक समाजाच्या व्यवसायाचा अभ्यास करणे.

३. लातूर जिल्हयातील नाभिक समाजाची आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४. नाभिक समाजातील सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

५. नाभिक समाजातील आर्थिक व सामाजिक बदलाचा अभ्यास करणे.

६. लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या विविध समस्येंचा अभ्यास करणे

**संशोधनाची गृहीतके Hypothesis**

१. लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती हालाकीची होत चालली आहे.

२. नाभिक समाज हा असंघटीत आहे.

३. लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाला अनेक संकटाचा सामना करावा लागतो.

४. लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाची शैक्षणिक स्थिती मागासलेली आहे.

५. लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाला शासनाचे लाभ व सवलती कमी प्रमाणात मिळतात.

६. नाभिक समाजातील व्यवसायात वाढ झालेली आहे.

**संशोधन पद्धती Research Methodology**

**प्राथमिक साधने-**

प्रस्तूत संशोधनात प्राथमिक सामुग्रीमध्ये लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

**दुय्यम साधने -**

द्वितीय सामुग्रीमध्ये महाराष्ट्रातील जिल्हा सर्वेक्षण, जनगणना सर्वेक्षण डायरी, अपेक्षित ठिकाणी भेटी, पोस्ट ऑफिस, टेलीफोन, मोबाईल, ईमेल, सरकारचे अहवाल फोटोग्राफी, नकाशे,

पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, प्रबंध, वार्षिक अहवाल, शासनाने स्थापित केलेल्या समित्याचा अहवाल, इंटनेट, जिल्हा जनगणना अहवाल, इ साधनाचा आधार घेऊन हे संशोधन पूर्ण केले जाणार आहे.

## नमुना निवड Sample Method

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून यामध्ये लातूर जिल्हयातील नाभिक समाजाची आकडेवारी लक्षात घेऊन सर्वेक्षण पध्दतीने नमुना निवड करुन संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. यासाठी एकूण नाभिक समाजाच्या आकडेवारीनूसार सूक्ष्म पध्दतीने संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी सांख्यिकीय पध्दतीचा वापर केला जाईल. जसे सरासरी, टक्केवारी, साधी वाढ आणि प्रमाण विचलन या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी पुढील सुत्राचा आवश्यकतेनुसार उपयोग करण्यात येईल.

$$a = \frac{\Sigma x}{N}$$

$$SD = \sqrt{\frac{\Sigma dx^2}{N} - \left[\frac{\Sigma dx}{N}\right]^2}$$

## संशोधनाची व्याप्ती Scope of Research study

प्रस्तुत संशोधन हे मराराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास आर्थिक व सामाजिक  बदलाशी निगडीत आहे या अभ्यानसासाठी निवडलेला कालखंड २०१२ ते २०२२ दशक आहे. या संशोधनाची व्यासप्तील लातूर जिल्ह यापूरती मर्यादीत आहे.

**संशोधनाच्या मर्यादा Limitation of Research**

संशोधनाची माहीती मिळविण्यासाठी पुढील काही मर्यादा येऊ शकतात.

१. प्रस्तुत संशोधन हे केवळ नाभिक समाजाशी निगडीत आहे.

२. सदरील संशोधन लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

३. प्रस्तुत संशोधनात नाभिक समाजातील बरीच कुंटूबे ही निरक्षर असण्याची शक्यता आहे. त्यामुळे आकडेवारी योग्य मिळेलच याची शाश्वती नाही.

४. प्रस्तूत संशोधन विषयाचा कालावधी २०१२-२०२२ म्हणजेच १० वर्षाचा आहे.

५. प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजातील आर्थिक व समाजिक परिस्थितीवर आधारित आहे.

**संशोधनाचे क्षेत्र व कालमर्यादा**

प्रस्तूत संशोधनासाठी लातूर जिल्हा हे भौगोलीक क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (२०१२-२०२२) हे दशक आहे प्रस्तुत संशोधनात निवडण्यात आलेला कालावधी- २०१२-२०२२ दशकापुरता आहे.

**संशोधनाची कालावधी व नियोजन**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी पुढीलप्रमाणे कालावधीची विभागणी करण्यात आलेली आहे.

१) माहिती संकलनासाठी - ६ महिने

२) प्रकरण १ व २ साठी - ७ महिने

३) प्रकरण ३ व ४ साठी - ७ महिने

४) प्रकरण ५ व ६ साठी - १० महिने

५) प्रकरण ७ साठी - ५ महिने

**प्रकरण विभागणी**

१) **प्रकरण पहीले - प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणात भारतातील नाभिक समाजाच्या प्रमुख समस्येंचा अभ्यास, केला जाईल. तसेच महाराष्ट्रातील बारा बलुतेदाराच्या समस्या आणि लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास या प्रकरणा केला जाईल.

२) **प्रकरण २ रे - संशोधन साहित्याचे सिंहावलोकन व संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनात नाभिक समाजाचे थोर संत सेना महाराज, भारतरत्न माजी पंतप्रधान कै. गुलझारीलाल नंदा यांच्या विविध ग्रंथातून द्वितीयक सामुग्रीचे संग्रहण करून विश्लेषण करण्यात येईल.

३) **प्रकरण: ३ रे - लातूर जिल्ह्यातील नाभीक समाजाचा आढावा**

प्रस्तुत प्रकरणात भारताचा इतिहास महाराष्ट्राचा इतिहास, लातूर जिल्ह्याचा पूर्व इतिहास, निर्मीती, भौगोलीक परिस्थिती, लोकसंख्येचा तालुकानिहाय आर्थिक सामाजिक, सांस्कृतीक व पर्यावरणीय संरचनेचा आढवा घेतला जाईल.

४) **प्रकरण चौथे ४ - लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती**

लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती अभ्यासणे, लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाचे स्थान, विस्तार, व्यवसायिक रचना, रहाणीमानाचा दर्जा, द्रारिद्रय, बेरोजगारी यांची

तुलनात्मक माहीती घेतली जाईल व प्रश्नावली आणि मुलाखतीद्वारे विश्लेषण केले जाईल.

**५) प्रकरण पाचवे – लातूर जिल्ह्यातील नाभिक समाजाच्या समस्या**

प्रस्तुत प्रकरणात नाभिक समाजाच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे. नाभिक समाजाच्या विकासासाठी उपाययोजनाचा आढावा घेणे.

**६) प्रकरण ६ वे.- सारांश, निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तुत संशोधनातून शेवटी निष्कर्ष व शिफारशी काढल्या जातील. व त्यावर सुधारणा केली जाईल.

## संदर्भग्रंथ सूची


१. श्री माधवराव दालीलवार - इंडियन कास्टीस्टीम, नंदा मौर्या डिनेस्टी

२. भगवान शंकरराव वैद्य - नाभिक समाजाचा इतिहास

३. शशिकांत तुकाराम चव्हाण - नाभिक भूषण विशेषांक

४. शशिकांत तुकाराम चव्हाण -नाभिक समाजाचा गौरव ग्रंथ

५. शशिकांत तुकाराम चव्हाण - सम्राट चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक

६. श्री. मारुती छत्रपती गायकवाड, श्री कल्यागण दळे, शशिकांत चव्हाण, श्री वैद्य भगवान,- नाभिक राजा ते नाभिक रंक

७. प्रा. श्रावण देवरे , फुले आंबेडकर तत्वज्ञान संस्था नाशिक - ओ.बी.सी जणगणना जीव-घेणा संसदीय संघर्ष

८. संपादक – शशिकांत तुकाराम चव्हाण - बदलत्या काळाचा वेध घेणारा महाराष्ट्राचा जाहीरनामा, प्रकाशक- महाराष्ट्र ओ.बी.सी. फेडरेशन

९. सौ सुर्यवंशी अनुराधा महेश, श्री सुर्यवंशी महेश गोविंदराव - निख्रा-यांची केली फुले

१०. भगवान शंकरराव वैध, नाभिक पुराण, प्रकाशक संत सेना महाराज सेवाभावी संस्था, सेलू जि. परभणी

११. गोसावी रा., २००५ श्री सेना महाराज चरित्र, आवृत्ती १ ली, सारथी प्रकाशन, पुणे

१२. गोरे र. मा., २००४, नाभिकपुराण, (पुर्नआवृत्ती), कळमनुरी

१३. जगताप ह.ना., २००६, शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तन, नित्यनुतन प्रकाशन, आवृत्ती १ ली, पुणे

१४. गटकळ रंजना संतोष, २००५, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास, प्राजक्ता प्रकाशन, आवृत्ती २ री, नाशिक

१५. कामत अशोक का. अ., मराठी संतकवि सेना न्हावी, खंड -२१, प्रसाद प्रकाशन, पुणे.

१६. Google Wikipidia.com

**संशोधक**

**लता रंगराव माने**

(एम.ए., बी.एड. )

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. शेषेराव श्रीमंतराव देवनाळकर**

M.A., B.Ed., NET & Ph.D.

अर्थशास्त्र विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक,

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर

***Research Supervisor,***
Faculty of Humanities,
Research Centre: Peoples College,
Nanded
Swami Ramanand Teerth Marathwada
University, Nanded
E-mail : sdevnalkar44@gmail.com

***Prof. Dr. S.S. Devnalkar***
M.A. (Eco. Poli. Sci., Hist.) B.Ed., NET, Ph.D.
Professor and Head
Department of Economics
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga
Dist. Latur - 413 521
Mob. No.: 9850037250

दिनांक.  /  / 2023

मा.

सहाय्यक कुलसचिव,

पदव्युत्तर विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**विषय, : सिनॉपसीस स्वीकारणे बाबत**

महोदय,

वरील विषयी अनुसरून विनंतीपूर्वक अर्ज करण्यात येतो की, मी डॉ. एस. एस. देवनाळकर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, येथील असून आपल्या विद्यापीठात पीएच.डी. चा मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहे. माझ्या संशोधक विद्यार्थीनी **माने लता रंगराव** याने **लातूर जिल्हयातील नाभिक समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास** (कालावधी - 2012 ते 2022) हा विषय निवडलेला असून त्यांचे सिनॉपसीस स्वीकारून सहकार्य करावे. ही विनंती